ePaper
# पुण्यातील पर्यटकांबाबत मोठी दुर्घटना, तारकर्ली समुद्रात 5 जण बुडाले

वर्ष - 8 । अंक - 218 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

### आतील पानांत
- युपीने वुमन्स मिळवला पहिला विजय
- ऑस्ट्रेलियाचा ऐतिहासिक विजय
- चीनमध्ये आढळला नवा करोना व्हायरस!
- लग्न मोडलं म्हणजे शेवट होत नाही

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 23 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## धनंजय मुंडे भटकले, माणिकराव कोकाटे लटकले, काहीजण सटकले!

# दादांचे शिलेदार.. भ्रष्टाचार शानदार!

### भ्रष्ट मंत्र्यांमुळे राष्ट्रवादीच नव्हे, सरकारच अडचणीत!

। मुंबई । महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा त्यांच्याच शिलेदारांमुळे दररोज अडचणीत येत चालला आहे. 'बुडत्याचा पाय खोलात' पडत आहे. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरचे आरोप, त्या पाठोपाठ मंत्री माणिकराव कोकाटे यांना कोर्टाने सुनावलेला कारावास, या घटना फारच चिंतनीय आहेत. त्यापेक्षा या मंत्र्यांवर कारवाई केली जात नाही, हे जास्त चिंताजनक आहे.**



अजितदादांचा पक्ष 'महायुती' मधील एक प्रमुख पक्ष असून ते सत्ताधारी आहेत. त्यांच्या 'कलंकित' मंत्र्यांमुळे सरकारच बदनाम होत आहे, विरोधकांकडून रोज टीकास्त्रे सोडली जात आहेत. तथापि, कारवाई होत नाही, ही बाब फारच गंभीर बनत चालली आहे. 'कलंकित' चेहऱ्याचा समूह एखाद्या राज्याचा कारभार बघत असेल तर भविष्यात त्या राज्याचे काय होईल, हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाची गरज नाही. सत्तेचा दुरुपयोग, स्वार्थी वृत्ती, किळसवाणी कामे आणि कपटी वृत्ती यांचा मिलाफ आज राजकीय पक्षात अनुभवास येत आहे. जो राजकारणी सर्वात जास्त अवगुणी तो प्रचंड मतांनी निवडणूक जिंकतो आहे. जणु काही, कुंपणच शेत खात आहे. रक्षकच भक्षक बनत असतील, तर न्याय मागायचा कुणाकडे ?

#### तीन पक्षांचे नव्हे, तीन पैशाचे सरकार..!

तीन पक्षांचे सरकार आता जनतेला तीन पैशाचे सरकार वाटत आहे. 'महायुती' त दोन मंत्र्यांवर गंभीर स्वरूपाचे आरोप झालेत. माजी कृषिमंत्री व वर्तमान कृषिमंत्री आरोपीच्या पिंजऱ्यात उभे आहेत. महाराष्ट्रातील बळीराजाला वाली नाही हेच खरे! मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर भ्रष्टाचार, व्यभिचार व गुन्हेगारीचे आरोप झालेत. दुसरे मंत्री कोकाटे यांच्यावर फसवणूकप्रकरणी कोर्टानेच वरवंटा फिरविला आहे. त्यांना दोन वर्षांचा कारावास सुनावण्यात आला आहे. लाजलज्जा कंबरेला बांधून दोघेही मंत्रिपद सोडायला तयार नाहीत. यापूर्वी, सुनील केदारप्रकरण आपण अनुभवले आहे. जिल्हा बँक घोटाळ्यात ते आरोपी होते. केदार यांना पाच वर्षांची शिक्षा सुनावली गेली. दंडसुद्धा ठोठावला, हायकोर्टाने त्यांचा अर्ज फेटाळला होता. आता, कोकाटेप्रकरण समोर आले. त्यांचा केदार होईल काय ? दोन मंत्र्यांचे राजीनामे घेणे, हाच अजितदादांपुढे पर्याय आहे, हे मात्र निश्चित !

### आरोप आणि चौकशी सुरु असलेल्या नेत्यांची टोळीच!

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा निवडून येणाऱ्या टोळीचा पक्ष आहे, अशी टीका होत होती. त्यातून अजितदादा फुटले. पण विविध प्रकरणे आणि भ्रष्टाचार, चौकशीचा ससेमिरा असणारेच त्यात आहेत. सुनील तटकरे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ, माणिकराव कोकाटे, धनंजय मुंडे आणि स्वतः अजित पवार अशी मोठी रांगच आहे, हे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते !

## 'पुणेकरांना मुळशी धरणातून पाणीपुरवठ्याचा प्रस्ताव लवकरच मार्ग निघेल'; मंत्री चंद्रकांत पाटील यांना विश्वास

। पुणे । महाईन्यूज

**पुणे शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी पाहता, खडकवासलामधून पाणीपुरवठा होणे शक्य नाही. त्यामुळे पुणेकरांसाठी मुळशी धरणातूनपाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून, त्यावर लवकरच मार्ग निघेल, असा विश्वास चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला.**



पाटील यांनी शुक्रवारी कोथरूड विधानसभा मतदारसंघातील पाणीपुरवठ्याचा आढावा घेतला. त्यानंतर ते बोलत होते. पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप, अधीक्षक अभियंता श्रीकांत वायदंडे, प्रसन्नराघव जोशी, कार्यकारी अभियंता विनोद क्षीरसागर, उप अभियंता प्रशांत कदम, कनिष्ठ अभियंता गणेश काकडे उपस्थित होते.

समान पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत पुणे शहरात १४१ झोन निश्चित केले असून, त्यातील कोथरूड विधानसभा मतदारसंघात एकूण १७ झोन आहेत. अस्तित्वातील वितरण नलिका व आवश्यकतेनुसार नवीन जलवाहिन्या टाकून नागरिकांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे, असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी पाटील यांना दिली. तसेच कोथरूड मतदारसंघातील १७ झोनमधील अस्तित्वातील नवीन पाण्याच्या टाक्यांपैकी १६ टाक्यांचे काम पूर्ण झाले असून आयडियल कॉलनी टाकीच्या जागेबाबत लॉ कॉलेज, पुणे महापालिका यांच्यामध्ये जागेबाबत न्यायालयीन वाद सुरू आहे.

### पाण्याच्या टाकीचे काम अपूर्ण

पाण्याच्या टाकीचे काम अपूर्ण असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. त्यावर सदर सर्व कामे जलदगतीने पूर्ण करावीत, तसेच आयडियल कॉलनीच्या टाकीचा प्रश्न सामोपचाराने सर्वांना विश्वासात घेऊन मार्गी लावावा, अशा सूचना पाटील यांनी दिल्या. समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत कोथरूडमधील १७ झोनमध्ये २८ हजार ३९७ इतके पाण्याचे मीटर बसविणे प्रस्तावित आहे. त्यापैकी २३ हजार २०९ पाण्याचे मीटर बसवले आहेत. उर्वरित ५ हजार मीटर बसवण्याचे काम सुरू आहे. या कामामुळे पाण्याच्या गळतीचे प्रमाण पूर्वीपेक्षा कमी झाले असून, २० टक्क्यांपर्यंत कमी करण्यासाठी आवश्यक कामे सुरू आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिले.

# राज ठाकरे यांना महायुतीत घेण्यास विरोध !

## राज ठाकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भेटले : आठवले

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज ठाकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भेटले ते ठिक आहे, मात्र ठाकरे यांना महायुतीत घेणे बरोबर नाही. त्यांचा महायुतीला काही फायदा होत नाही. आताच आम्हाला सत्तेत हिस्सा मिळत नाही. ठाकरे आले तर काय मिळणार? असा सवाल करून केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी राज ठाकरे यांना महायुतीत घेण्यास विरोध केला.**



निवडणुका एकत्रित लढण्याची मागणीही त्यांनी केली.आठवले म्हणाले, 'अनेकदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढल्या जात नाहीत. महाविकास आघाडीही एकत्र निवडणूक लढण्याची शक्यता नाही. पण, महायुतीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका एकत्रितपणे लढवाव्यात असा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी एकत्र बसावे. महायुतीने लोकसभा, विधानसभेला रिपाईंला डावलले असले तरी मी त्यांना डावलणार नाही. रिपाईं पक्ष छोटा असला तरी गावागावात कार्यकर्ते आहेत. कार्यकर्त्यांना संधी द्यायची आहे. महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत आम्हाला डावलले जाणार नाही, अशी खात्री आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत चर्चा झाली आहे. संधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे'. 'राज्यघटना बदलणार ही अफवा होती, हे लोकांच्या लक्षात आले आहे. विधानसभेला लाडकी बहिणींनी मोठ्या प्रमाणात मतदान केले. त्याचाही फायदा महायुतीला झाला. दलित मतदार महायुतीच्या पाठीशी राहिला. अपेक्षेपेक्षा जास्त आमदार निवडून आले. मतदान यंत्रात दोष नाही. तर, महाविकास आघाडी दोषी आहे. ते हवेत राहिले आणि आम्ही जमिनीवर राहिलो. त्यामुळे महायुतीचा विजय झाला. निकषात बसणा-या लाडक्या बहिणीना अपात्र केले जाणार नाही. त्यांना वेळेत पैसे दिले जातील. शासनाकडे पैसे कमी असल्याने आता कडक निकष टाकले आहेत. विकास कामासाठी निधी लागत आहे. महसूल वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत', असेही ते म्हणाले. आठवले म्हणाले, 'पुणे, मुंबई, ठाणे या मोठ्या शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत गरिबांना पक्की घरे मिळत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. सुरुवातीला १८० चौरस फूट जागेची घरे मिळत होती. त्यानंतर २४५ आणि आता ३०० चौरस फुटाची घरे मिळत आहेत. मात्र, आम्ही राज्य शासनाकडे कमीत ४५० चौरस फुटाची घरे असावीत, असा प्रस्ताव दिला आहे'.सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणी कारवाई व्हावी परभणीतील राज्यघटना विटंबना विरोधी आंदोलनात पोलिसांनी केलेल्या मारहाणीत मृत्यूमुखी पडलेल्या सोमनाथ सुर्यवंशीला न्याय मिळायला उशीर होत आहे.

### महायुतीच्या नेत्यांनी एकत्र बसावे.

जबाबदार पोलिसांवर तातडीने कारवाई होणे गरजेची आहे. मात्र, अद्याप कारवाई झालेली नाही. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, असेही आठवले म्हणाले.निवडणुका एकत्रित लढण्याची मागणीही त्यांनी केली.आठवले म्हणाले, 'अनेकदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढल्या जात नाहीत. महाविकास आघाडी एकत्र निवडणूक लढण्याची शक्यता नाही. पण, महायुतीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका एकत्रितपणे लढवाव्यात असा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी एकत्र बसावे. महायुतीने लोकसभा, विधानसभेला रिपाईंला डावलले असले तरी मी त्यांना डावलणार नाही. रिपाईं पक्ष छोटा असला तरी गावागावात कार्यकर्ते आहेत. कार्यकर्त्यांना संधी द्यायची आहे. महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत आम्हाला डावलले जाणार नाही, अशी खात्री आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत चर्चा झाली आहे. संधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे'. 'राज्यघटना बदलणार ही अफवा होती, हे लोकांच्या लक्षात आले आहे.

# आरटीई शुल्क प्रतिपूर्तीचा दर निश्चित

## 17 हजार 670 रुपये या दराने शुल्क प्रतिपूर्ती करण्यास मान्यता

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीचा दर शालेय शिक्षण विभागाने निश्चित केला. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षात प्रति विद्यार्थी १७ हजार ६७० रुपये या दराने शुल्क प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मात्र, या दराला संस्थाचालकांचा विरोध असून, सरकारी करांपासून सगळ्याचेच दर वाढलेले असताना आरटीई शुल्कपूर्तीचा दर का वाढत नाही, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.**




आरटीईअंतर्गत वंचित व दुर्बल घटकांतील बालकांना खासगी विनाअनुदानित स्वयंअर्थसहायित शाळांमध्ये उच्च प्राथमिक स्तरापर्यंत मोफत शिक्षण देण्यात येते. या विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती शिक्षण विभागाकडून शाळांना केली जाते. त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठीच्या शुल्क प्रतिपूर्तीचा दर निश्चितीचा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने प्रसिद्ध केला. शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करताना काही बाबींची पडताळणी करण्याबाबतही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार, किमान २५ टक्के जागांवर वंचित व दुर्बल घटकांतील बालकांना प्रवेश दिलेल्या शाळांनी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काचा तपशील सरल किंवा आरटीई संकेतस्थळावर जाहीर केलेला असावा. तसेच, स्वत:चे संकेतस्थळ असलेल्या शाळांनी त्यांच्या संकेतस्थळावरही शुल्काचा तपशील जाहीर केलेला असावा, असे म्हटले आहे. याशिवायही इतर बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत.दरम्यान, शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम थकीत आहे. त्यामुळे शुल्क प्रतिपूर्तीचा दर ३० हजार रुपये करण्याची मागणी आहे. महागाई वाढली आहे, सरकारी कर वाढले आहेत, शाळांचे शुल्क वाढले आहे, शिक्षकांचे वेतन वाढलेले आहे, लाडक्या बहिणींची भेटही वाढली आहे. केवळ आरटीई शुल्क प्रतिपूर्तीचा दर वाढत नाही, असे मेस्टाचे अध्यक्ष संजय तायडे पाटील यांनी सांगितले.आरटीईअंतर्गत वंचित व दुर्बल घटकांतील बालकांना खासगी विनाअनुदानित स्वयंअर्थसहायित शाळांमध्ये उच्च प्राथमिक स्तरापर्यंत मोफत शिक्षण देण्यात येते.

### शुल्काचा तपशील जाहीर केलेला असावा

या विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती शिक्षण विभागाकडून शाळांना केली जाते. त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठीच्या शुल्क प्रतिपूर्तीचा दर निश्चितीचा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने प्रसिद्ध केला. शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करताना काही बाबींची पडताळणी करण्याबाबतही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार, किमान २५ टक्के जागांवर वंचित व दुर्बल घटकांतील बालकांना प्रवेश दिलेल्या शाळांनी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काचा तपशील सरल किंवा आरटीई संकेतस्थळावर जाहीर केलेला असावा.

# माजी सैनिकांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध!

## आमदार महेश लांडगे यांची भावना; दिघीतील माजी सैनिक विकास संघासाठी 10 संगणक भेट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिघी येथील माजी सैनिक विकास संघासाठी भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्याकडून दहा संगणक भेट देण्यात आले आहेत. माजी सैनिक विकास संघातर्फे अभ्यासिका चालवली जाते. या अभ्यासिकेला आमदार लांडगे यांनी भेट दिली होती यावेळी अभ्यासिकेसाठी संगणक देण्यात येतील असे शब्द आमदारांनी दिला होता तो शब्द त्यांनी पूर्ण केला. याशिवाय माजी सैनिकांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध असल्याची भावना यावेळी आमदार लांडगे यांनी व्यक्त केली आहे.**



दिघी येथे मोठ्या प्रमाणात माजी सैनिक वास्तव्याला आहेत. या माजी सैनिकांच्या माध्यमातून माजी सैनिक विकास संघ कार्यरत आहे. या विकास संघा तर्फे अभ्यासिका चालवली जाते या अभ्यासिकेचे कामकाज पाहण्यासाठी भाजप नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी अभ्यासिकेची पाहणी केली येथील कामकाजाचा आढावा घेतला यानंतर या संघासाठी संगणकाची गरज आहे हे लक्षात आल्यानंतर आमदार महेश लांडगे यांनी या पदाधिकाऱ्यांना संगणक देण्याचे आश्वासन दिले होते त्याप्रमाणे त्यांनी लेनोवो कंपनीचे ऑल-इन-वन (हाय कन्फिगरेशन) 10 संगणक भेट दिले आहेत.

यावेळी माजी नगरसेवक विकास डोळस, कुलदीप परांडे, माजी सैनिक विकास संघाचे अध्यक्ष कॅप्टन नरेंद्र सिंह चव्हाण, उपाध्यक्ष भिसे, भास्कर आंब्रे, तसेच अन्य माजी सैनिक उपस्थित होते. यावेळी माझी सैनिक विकास संघाच्या वतीने आमदार महेश लांडगे यांचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांचे आभारही मानले.

> देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या, घरावर तुळशीपत्र ठेवत आपल्या तमाम देशवासियांच्या संरक्षणाची जबाबदारी खांद्यावर घेणारे सैनिक आमच्यासाठी आदर्श आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील दिघी या भागात माजी सैनिकांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. ही खरे तर आपल्यासाठी गौरवाची गोष्ट आहे. या माजी सैनिकांना कोणतीही अडचण येऊ नये. यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. त्यांच्या हितासाठी सदैव दक्ष राहणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे.
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# खाजगी “आरओ” प्लॅन्टसवरील निर्बंध हटवण्याचा निर्णय

## पिण्याच्या शुद्ध पाण्याची गरज लक्षात घेऊन अटी व शर्तींसह या प्लॅन्ट्सना पुन्हा सुरु करण्यास परवानगी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील काही भागांमध्ये जीबीएसचे रुग्ण आढळून आल्याने, या भागातील ५८ खाजगी रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) प्लॅन्ट्स पूर्वी बंद करण्यात आले होते. मात्र, पिण्याच्या शुद्ध पाण्याची गरज लक्षात घेऊन महानगरपालिकेने ठराविक अटी व शर्तींसह या प्लॅन्ट्सना पुन्हा सुरू करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी काही अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.**






**महापालिकेच्या अटी व शर्ती:**

१) खाजगी “आरओ” प्लॅन्ट चालक यांनी महानगरपालिकेकडे रीतसर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित प्रभागातील कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांचेकडे अर्ज करावा.

२) खाजगी “आरओ” प्लॅन्ट मालक किंवा चालक यांनी तातडीने त्यांच्या मूळ उत्पादक कंपनीकडून किंवा प्लॅन्ट दुरुस्त करणारी संस्था यांचेकडून संपूर्ण “आरओ” प्लॅन्टसची देखभाल दुरुस्ती करून घेऊन त्याबाबतचा प्रत्येक ६ महिन्यांनी दाखला संबंधित कंपनीकडून घ्यावा. तसेच देखभाल दुरुस्तीचे प्रत्यक्ष काम सुरू असतानाचे सुस्पष्ट, तारीख, वेळ व जियो टॅगसह फोटो काढावेत.

३) मुख्य उत्पादक कंपनी किंवा प्लॅन्ट देखभाल-दुरुस्त करणारी संस्था यांचेकडून सदर प्लॅन्टच्या आउटलेटचे पाणी मानक, IS -10500 (2012) व WHO च्या मार्गदर्शक तत्वानुसार शुध्दीकरण करण्यासाठी प्लॅन्ट योग्य प्रकारे कार्यान्वित असल्याचा दाखला सादर करावा.

४) राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रयोगशाळेकडून सदर “आरओ” प्लॅन्टद्वारे येणारे पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत दर महिन्याला स्रोतामधील पाणी व शुद्ध केलेले पाणी यांची गुणवत्ता तपासणी करावी व टेस्ट रिपोर्ट त्यांचेकडून प्राप्त करून घ्यावा व तो प्रभागात सादर करावा.


५) या “आरओ” प्लॅन्टसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पाणी वापर करत असल्यास सदर नळजोड नियमान्वित करून, बिगर घरगुती दराने मीटरनुसार त्या पाण्याचे बिल महानगरपालिकेकडे भरावे. तसे न केल्यास कनेक्शन व आरओ प्लॅन्ट कायमस्वरूपी बंद केले जाईल.

### दूषित पाण्यामुळे ‘जीबीएस’ची लागण

शहरातील विविध भागात आतापर्यंत ३२ ‘जीबीएस’चे रूग्ण आढळले आहेत. यामधील २३ रूग्ण उपचार घेऊन पूर्णपणे बरे झाले आहेत. दूषित पाण्यामुळे ‘जीबीएस’ची लागण होत असल्याच्या शक्यतेने महापालिकेच्या पाणी पुरवठा विभाग आणि वैद्यकीय विभागाच्या वतीने विविध उपाय योजना करण्यात येत आहेत. शहरातील विविध भागातील बेकायदेशीर ५८ आरओ प्रकल्प लाखबंद केले आहेत. प्रकल्प अनिश्चित काळासाठी बंद ठेवले होते. अटी व शर्तीसह या प्रकल्पांना पुन्हा सुरू करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे.

> महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे नागरिकांना शुद्ध व योग्य प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल. तरी, संबंधित आरओ प्लॅन्ट धारकांनी महापालिकेने दिलेल्या अटी व शर्ती आणि नियमांचे पालन करून अधिकृत परवानगी घेऊनच आरओ प्लॅन्ट्स सुरू ठेवावेत.
>
> **– प्रमोद ओंभासे,**
> मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### निर्हेतुक कर्मात भगवंत

खरोखर, आज आपल्याला आपले अंतरंग ओळखण्याची खरी गरज आहे. सत्कर्म असो किंवा दुष्कर्म असो, हेतूवर सर्व काही अवलंबून असते. पुष्कळ पुण्यकर्मे केली, आणि काही तरी विषयाचा हेतू मनात धरला, तर काय उपयोग ! काबाडकष्ट खूप केले, बायकोपोरे टाकून बाह्यांगाने कितीही केले, तरी मन जोपर्यंत तिथे नाही तोपर्यंत राम नाही भेटणार. मनाला भगवंताची तळमळ लागली तरच त्याचा उपयोग. निर्हेतुक कर्मात भगवंत असतो, म्हणून आपली कर्मे तशी करावीत. खरे पाहता प्रापंचिकाएवढे काबाडकष्ट साधकाला, पारमार्थिकाला नसतात. प्रपंचाच्या काबाडकष्टांपेक्षा निम्म्याने जरी भगवंताकरिता केले तरी खूप फायदा पदरात पडेल. ज्या स्थितीत भगवंताने आपल्याला ठेवले त्या परिस्थितीतून त्याला ओळखणे सहज शक्य आहे. पण आपण विषयाकडे दृष्टी ठेवून कर्मे करतो, आणि भगवंत भेटत नाही म्हणून दु:खी होतो, याला काय करावे ? दैत्यदानवांनी भगवंताची तपश्चर्या केली, आणि समर्थांनीही केली; दानवांनी हेतू धरून केली त्यामुळे त्यांना हेतूचा, विषयाचा लाभ झाला, परंतु भगवंत अंतरला; याउलट, समर्थांना भगवंताशिवाय दुसरा कशाचाही लाभ नको होता. त्या लाभातच त्यांनी सर्वस्व मानले. उत्कट प्रेमामुळे भगवंताचा ध्यास लागतो. भगवंताला पाहून ’तू भेटलास, आता मला काही नको’, अशी वृत्ती झाली पाहिजे, तरच मीपणा मरेल. भगवंताचा हात तर पुढे आहेच; आपलाच हात त्याच्यापर्यंत पोहोचत नाही. बुद्धीपेक्षा आणि पैशापेक्षा सदाचरणाचे वजन जास्त असते. सदाचरण असून भगवंताची निष्ठा असेल, आणि आहे त्या परिस्थितीत समाधान ठेवण्याची सवय असेल, तर प्रापंचिक सुख लाभते. सुख हे कुठून उत्पन्न करायचे नसून ते आपल्या वृत्तीमध्येच असते. ‘मी’ भगवंताचा आहे, तसेच ‘सर्वजण’ भगवंताचे आहेत. म्हणून भगवंतावर प्रेम केले की सर्व जगावर प्रेम बसेल. ज्याप्रमाणे भगवंताच्या प्रसादामध्ये एखादा कडू बदाम आला तरी तो आपण खातो, त्याप्रमाणे भगवंताने एखादे वेळी दु:ख दिले तर ते आनंदाने सोसायला पाहिजे. चिकित्सा थोडी बाजूला ठेवून भगवंताचे आपण स्मरण करावे. अंत:करणाची शुद्धी नामाशिवाय नाही होणार. नामापरते काही नाही हे एकदाच ज्याच्या मनाने घेतले त्याला दुसरे काही सांगावे नाही लागत. मीठ म्हणून जरी साखर खाल्ली तरी साखरेची गोडी आल्याशिवाय राहात नाही; त्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत जरी नाम घेतले तरी ते आपल्याला तारकच ठरेल यात शंका नाही.

बोधवचन:- ज्याच्यामागे उपासनेचा जोर आहे तोच जगात खरे काम करतो.

# दिल्ली साहित्य संमेलनात मोदी हेच ‘मॅन ऑफ द मॅच’!



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**दिल्लीमध्ये आयोजित ९८ व्या मराठी साहित्य संमेलनात जो उद्घाटन सोहळा पार पडला, त्यावेळी सर्वांची जोरदार भाषणे झाली. पण, साहित्य संमेलनाचे मैदान पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनीच गाजवले. तेच ‘मॅन ऑफ द मॅच’ ठरले ! वास्तविक, यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ नेते शरद पवार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर तसेच अन्य प्रतिथयश वक्ते होते, पण मोदी यांनी कधी हिंदीतून तर कधी मराठीतून केलेली फटकेबाजी मराठी माणसाच्या मनावर बिंबली आणि ती खूप काळ स्मरणातही राहील !**



#### संस्कारित राजकारण्याची देहबोली

मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवातच प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात केली. शरद पवार यांनी हे भाग्य माझ्या वाटेला दिले, हे सांगताना आणि त्याच्या बरोबर वावरताना जी देहबोली मोदीजी यांची होती, ती एका संस्कारित राजकारण्याची होती. उद्घाटनावेळी दीप प्रज्वलन करताना पवारांना बोलावून घेणे, खुर्ची सरकवून त्यांना बसण्यास मदत करणे, स्वतः पाणी ओतून पवार यांना देणे.. हे सगळे पवार यांच्या ज्येष्ठत्वाचा सन्मान होता. राजकीय मतभेदाच्या पलीकडे संबंध असले पाहिजेत, हे खानदानी संस्कार त्यांनी अगदी सुरुवातीलाच महाराष्ट्रातील अगदी फालतू राजकारण्यांना दाखवून दिले ! प्रत्यक्ष भाषणाच्या वेळी व्यासपीठावर उपस्थित असणाऱ्या किंवा दूरवरून पाहणाऱ्या सगळ्या पुरोगामी, तथाकथित समाजवाद्यांना तसेच मोदीद्वेष्टांना त्यांनी मराठी आणि महाराष्ट्राची जी परंपरा आठवण करून दिली, त्यातून तात्विक आणि वैचारिकदृष्ट्या आपण किती पक्के आहोत, हेही त्यांनी दाखवून दिले. त्यांचे भाषण ऐकून त्यांच्या धाडसाचे, योग्य वेळ साधण्याचे आणि विरोधकांना न डगमगता स्पष्ट बोलण्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच !

#### पुरोगामीत्वाच्या नावाखाली बाजार

सगळ्या मंडळीनी पुरोगामीत्वाच्या नावाखाली साहित्य, संस्कृती आणि कला क्षेत्रात जो धुमाकूळ घातला आहे, त्या सर्वांना महाराष्ट्र नेमका कुणामुळे ओळखला जातो ? मराठी भाषेचे वैभव कसे आहे ? हे सांगताना ज्या महापुरुषांची नावे मोदी यांनी घेतली, त्याच महापुरुषांना या पुरोगामींच्या विशिष्ट प्रकारच्या कारस्थानांमुळे हद्दपार करण्याचा गेली कित्येक वर्षे जणू चंगच बांधला होता. महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी म्हणवणारे राजकारणी पण लाजेकाजेस्तव या महापुरुषांची आडून पाडून नावे घेत होते. पण, मोदींनी एकाचवेळी पुरोगामी आणि हिंदुत्ववादीना तत्वाचा, विचाराचा निग्रह काय असतो आणि तो कसा मांडता येतो, हेच कुठलाही आक्रस्ताळेपणा न करता सहजपणे दाखवून दिले. पुरोगामी विचारसरणीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याची खेळी मोदींनी यशस्वीपणे राबवली.

#### मराठीचा डौलच न्यारा

नुकताच अभिजात दर्जा मिळालेली आणि कित्येक वर्षांची परंपरा असलेली मराठी भाषा ही ज्ञानेश्वर माऊलींच्या ज्ञानेश्वरी मध्ये आहे, तुकारामांच्या गाथेत आहे, हे सांगताना आपली उज्ज्वल संत परंपरेची आठवण करून दिली. त्याच बरोबरं समर्थ रामदास स्वामी यांच्या मराठा तितका मेळवावा ! हा उल्लेख करताना त्यांनी कुठलाही न्यूनभाव मनात ठेवला नाही. आपल्याकडील काही संतांना डावलण्याचं कुभांड विकृत मंडळी रचत असतात त्यांना मोदींनी चपराक दिली आहे.

#### टिळक, सावरकर, फडके, चाफेकर बंधू

संपूर्ण देशाला स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणारे लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू हे सगळे मराठी भाषिक होते, हे सांगताना जातीभेद करणाऱ्यांना त्यांनी तुला लगावला, अप्रत्यक्षपणे अधोरेखित केले.

#### गीतारहस्य आणि ज्ञानेश्वरीचेही कौतुक

लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्य ग्रंथाचा जाणीवपूर्वक दोनदा वेगवेगळ्या संदर्भात केलेला उल्लेख विशेष म्हणावा लागेल. मराठीमध्ये गीतेवर टीकात्मक ग्रंथ ज्ञानेश्वरी हा आजही सगळ्यांचा संदर्भ ग्रंथ आहे हे त्यांनी निक्षून सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाला साजेशी मराठी भाषा आहे आणि मग ‘छावा’ या सध्या सर्वात चर्चेत असणाऱ्या शंभूराजांच्या जीवनावरील हिंदी चित्रपटाचा उल्लेख करताना मोदीनी शिवाजी सावंत यांच्या मूळ ‘छावा’ या मराठी कादंबरी वरून हा चित्रपट निर्माण केला गेला आहे, हे आवर्जून सांगितले. त्यांनी पेशव्यांच्या पराक्रमाचा गौरव करताना कुठलेही आणि कसलेही आढेवेढे घेतले नाहीत.

#### सनावळी आणि संदर्भ तोंडपाठ

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक वर्षाला ३५० वर्षे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मवर्षाला ३०० वर्षे हा उल्लेख तर त्यांनीं केलाच, पण त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल त्यांनी काढलेले उदगार सर्व स्वयंसेवक , कार्यकर्ते यांना सुखद धक्का देणारे, सुखावणारे आणि अभिमान बाळगावा, असे ठरले. संघाचा उल्लेख बाकीचे वक्ते नेहमी टाळतात, त्यालाच मोदींनी उच्च स्तरावर नेऊन ठेवले !

#### संघामुळे मराठीशी संबंध दृढ

शंभर वर्षापूर्वी महाराष्ट्रात डॉ. केशव बळीराम हेडगेवार या महापुरुषाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेचे बीज रोवले आणि आता तो एक वटवृक्ष बनला आहे, हे त्यांनी ठणकावून सांगितले. वेदांपासून ते स्वामी विवेकानंद यांच्या विचारधारेला स्थापित करण्यासाठी निर्माण झालेले कार्य असा संघकार्याचे वर्णन करताना त्याचा उल्लेख ‘संस्कार यज्ञ’ या शब्दात त्यांनी केलाच आणि माझ्यासारख्या लाखो लोकांना देशासाठी समर्पित होण्याची प्रेरणा संघाने दिली आहे, हे पण विशेष करून सांगितले ! माझी मराठीची ओळख दृढ होण्यास संघ कारणीभूत आहे हेही त्यांनी स्पष्टपणे कबूल केले.

#### चक्क.. गजानन दिगंबर माडगूळकर

संपूर्ण महाराष्ट्राला गीत रामायण रचून मोहित करणारे आधुनिक वाल्मिकी गदिमा यांच्या पूर्ण नावाचा त्यांनी केलेला उल्लेख अनेकांना अचंबित करून गेला. तर सुधीर फडके यांच्याबरोबर या गीत रामायणाने अद्भुत परिणाम समाजजीवनावर केल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे चौफेर ज्ञान प्रत्येक शब्दातून स्पष्ट दिसत होते.

#### मोदींचे टोले ऐकण्याशिवाय पर्याय नव्हता

मराठी सारस्वतात गेल्या ३०/४० वर्षात घुसलेल्या बांडगुळाना त्यांच्या राजकीय आश्रयदात्यासमोर मोदी जेव्हा हा चिंतनशील आरसा समोर ठेवत होते, तेव्हा त्या सर्वांचे चेहरे हे बघण्यासारखे झाले होते. सत्य तर स्वीकारण्याशिवाय पर्याय नव्हता. पण, टाळ्या वाजवण्याचे साहस पण नव्हते. अधून मधून काही टाळ्यांच्या आवाजाने या संमेलनात काही राष्ट्रीय विचाराचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, हे कळत होते आणि महाराष्ट्रात साहित्याच्या क्षेत्रात अजूनही राष्ट्रीय विचाराच्या मंडळींना खूप पल्ला गाठायचा आहे, हे लक्षात येत होते.

अत्यंत सुंदर आणि स्वच्छपणे वाहणारा साहित्याचा प्रवाह विद्रोहामुळे गढूळ करणाऱ्या अनेकांना मोदींचे भाषण आणि विचार पटले नसतीलही, पण मराठीची परंपरा आणि तिचे पावित्र्य जपणे, एवढेच त्यांना पटले तरी खूप ! ज्या प्रमाणे, ब्राह्मण्यवादावर टीका करणे म्हणजे समाजवादी, त्याचप्रमाणे साहित्यावर टीका करणे म्हणजेच विद्वान असे समजणाऱ्यांना मोदींनी अक्षरशः धू..धू धुतले, आणि या उद्घाटन सोहळ्याचे ते ‘मॅन ऑफ द मॅच’ ठरले !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# खरी शिवसेना, राष्ट्रवादी कोणाची?

## अमित शाह यांचा शरद पवार, उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय जनता पक्षाचे नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर आहेत. अमित शाह यांचा हा दौरा आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वाचा मानला जात आहे. या दौऱ्यात अमित शाह हे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांबरोबर महत्वाची बैठक घेणार असल्याचं बोललं जात आहे. याबरोबरच अमित शाह यांच्या हस्ते आज प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील २० लाख लाभार्थ्यांना घरकुलांचे मंजुरीपत्र वाटप करण्यात आले आहे.**



### अजित पवार यांच्या कामाचं कौतुक

जनतेने महायुतीला ऐतिहासिक बहुमत दिलं. मात्र, त्याबरोबरच कोणती शिवसेना खरी आणि कोणती शिवसेना खोटी याचाही निर्णय जनतेने केला. तसेच कोणती राष्ट्रवादी खरी आणि कोणती राष्ट्रवादी खोटी याचाही निर्णय महाराष्ट्रातील जनतेने केला", असं म्हणत गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली.दरम्यान, गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यातील कार्यक्रमात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कामाचं कौतुक केलं. अमित शाह म्हणाले की, "अनेकदा असं होतं की अनेक सरकार सत्तेत येतात आणि घोषणा करतात.

या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील उपस्थित होते. दरम्यान, या कार्यक्रमात बोलताना अमित शाह यांनी राज्य सरकारच्या कामाचं कौतुक केलं. तसेच शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता जोरदार हल्लाबोल केला. "महाराष्ट्रातील जनतेने खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादी कोणाची हे निवडणुकीत दाखवलं आहे", अशी टीका अमित शाह यांनी केली आहे."मी महाराष्ट्रातील जनतेचे खूप खूप आभार मानतो. कारण महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला निवडणुकीत आशीर्वाद दिला. भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचं सरकार जनतेने बनवलं. जनतेने महायुतीला ऐतिहासिक बहुमत दिलं. मात्र, त्याबरोबरच कोणती शिवसेना खरी आणि कोणती शिवसेना खोटी याचाही निर्णय जनतेने केला. तसेच कोणती राष्ट्रवादी खरी आणि कोणती राष्ट्रवादी खोटी याचाही निर्णय महाराष्ट्रातील जनतेने केला", असं म्हणत गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली.दरम्यान, गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यातील कार्यक्रमात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कामाचं कौतुक केलं. अमित शाह म्हणाले की, "अनेकदा असं होतं की अनेक सरकार सत्तेत येतात आणि घोषणा करतात. त्यानंतर कितीतरी वर्ष घोषणा पूर्ण करण्यासाठी लागतात. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारला मी शुभेच्छा देतो. कारण राज्य सरकारने २० लाख कुटुंबाला घरे देण्याचं काम केलं. २० लाख कुटुंबांचं स्वप्न पूर्ण करण्याचं काम केंद्र सरकार आणि राज्य सरकारने मिळून केलं. आज एक महत्वाचा दिवस आहे. २० लाख कुटुंबाला स्वत:चं आणि हक्काचं घर मिळालं. त्या सर्वांना भारत सरकारच्यावतीने आणि महाराष्ट्र सरकारच्यावतीने शुभेच्छा देतो", असं अमित शाह यांनी म्हटलं आहे.या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील उपस्थित होते. दरम्यान, या कार्यक्रमात बोलताना अमित शाह यांनी राज्य सरकारच्या कामाचं कौतुक केलं. तसेच शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता जोरदार हल्लाबोल केला. "महाराष्ट्रातील जनतेने खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादी कोणाची हे निवडणुकीत दाखवलं आहे", अशी टीका अमित शाह यांनी केली आहे."मी महाराष्ट्रातील जनतेचे खूप खूप आभार मानतो. कारण महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला निवडणुकीत आशीर्वाद दिला. भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचं सरकार जनतेने बनवलं.

---

# गळ्यात भगवं उपरणं, धंगेकरांच्या स्टेट्सची चर्चा

## पुण्यात काँग्रेसला धक्का बसणार असल्याची रंगली चर्चा

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला फारसं यश मिळालं नाही. आता आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेससह सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरु आहे. मात्र, असं असताना काँग्रेसमध्ये काही नेते नाराज असल्याची चर्चा आहे. अशातच काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांचं एक व्हॉट्सअॅप स्टेट्स चर्चेत आलं आहे. रवींद्र धंगेकर यांनी ठेवलेल्या व्हॉट्सअॅप स्टेट्समधील फोटोत त्यांनी गळ्यात भगवं उपरणं परिधान केलेलं आहे. त्यामुळे रवींद्र धंगेकर यांच्या मनात नेमकं काय चाललंय? याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरु झाल्या आहेत.**





### आम्हाला आनंदच होईल : उदय सामंत

धंगेकर म्हणाले होते की,"माझ्या वैयक्तिक कामासाठी मी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर मी त्यांना माझ्या वैयक्तिक कामाचं स्वरुप सांगितलं, तेव्हा ते काम करून देतो बोलले. त्यांच्याकडे काम असल्यामुळे मला त्यांना भेटण्याची गरज पडली", असं रविंद्र धंगेकर म्हणाले होते.रवींद्र धंगेकर यांच्या व्हॉट्सअॅप स्टेट्सबाबत बोलताना शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी एक सूचक विधान केलं. मंत्री उदय सामंत यांनी म्हटलं की, "मला असं वाटतं की रवींद्र धंगेकरांनी गळ्यात जर भगवं उपरणं ठेवलं असेल आणि त्यावर जर भविष्यात धनुष्यबाण आला तर आम्हाला सर्वांना आनंदच होईल.

रवींद्र धंगेकर यांच्या व्हॉट्सअॅप स्टेट्सबाबत बोलताना शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी एक सूचक विधान केलं. मंत्री उदय सामंत यांनी म्हटलं की, "मला असं वाटतं की रवींद्र धंगेकरांनी गळ्यात जर भगवं उपरणं ठेवलं असेल आणि त्यावर जर भविष्यात धनुष्यबाण आला तर आम्हाला सर्वांना आनंदच होईल." दरम्यान, रवींद्र धंगेकर यांच्या स्टेट्सबाबत उदय सामंत यांनी ही सूचक प्रतिक्रिया दिल्यामुळे पुण्यात काँग्रेसला धक्का बसणार असल्याची चर्चा रंगली आहे.काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी त्यांच्या स्टेट्सला गळ्यात भगवं उपरणं घातलेला एक फोटो ठेवला आहे. तसेच त्या फोटोवर स्टेट्सला 'तेरे क़दमों के तले मिट्टी भी सोना बन गयी, जर हुआ दुश्मन जहाँ शमशीर तेरी तन गयी...' हे गाणे ठेवले आहे. त्यामुळे रवींद्र धंगेकर यांच्या स्टेट्सची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. तसेच रवींद्र धंगेकर हे काँग्रेस सोडणार का? याबाबत आता अनेकांनी तर्कवितर्क लावण्यास सुरुवात केली आहे.माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी काही दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेतली होती. रवींद्र धंगेकर यांनी अचानक घेतलेल्या या भेटीमुळे चर्चांना उधाण आलं होतं. मात्र, त्यानंतर या भेटीबाबत स्पष्टीकरण देताना आपण वैयक्तिक कामाच्या संदर्भात भेट घेतल्याचं स्पष्टीकरण रवींद्र धंगेकर यांनी दिलं होतं.

# चीनमध्ये आढळला नवा करोना व्हायरस!

## चीनी संशोधकांनी वटवाघुळांमध्ये शोधून काढला व्हायरस

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चीनच्या संशोधकांनी वटवाघुळांमधील नवीन कोरोना व्हायरस शोधून काढला आहे, ज्यामुळे जगभरातील देशांची चिंता वाढली आहे. पाच वर्षांपूर्वी चीनच्या वुहान येथून करोना व्हायरस संपूर्ण जगात पसरला होता, ज्यामध्ये लाखो लोकांनी आपला जीव गमावला होता. त्यानंतर आता मानसांमध्ये पसरू शकतो असा नवीन करोना व्हायरसचा प्रकार आढळला आहे.**

व्हायरोलॉजिस्ट शी झेंगली (SHI ZHENGLI) यांच्या नेतृत्वाखालील चिनी संशोधकांच्या टीमने वटवाघुळांमधील हा नवीन करोना व्हायरस शोधला आहे. या नवीन व्हायरसचे नाव 'HKU5-COV-2' असे असून हा व्हायरस मर्बेकोव्हायरस (MERBECOVIRUS) सबजीनसशी संबंधित आहे. तसेच हा नव्याने आढळलेला स्ट्रेन कोविड-१९ प्रमाणेच, तशाच पद्धतीने मानवी पेशींमधील ACE2 रिसेप्टरबरोबर जोडला जाऊ शकतो, असेही रॉयटर्स या वृत्तसंस्थेने एका अभ्यासाच्या हवाल्याने दिलेल्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे.सेल (CELL) या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासानुसार, HKU5-COV-2 हा व्हायरस प्रयोगशाळेत मानवी पेशींना संक्रमीत करत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे हा भविष्यात इतर प्राण्यांमध्ये पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, हा व्हायरस वेगवेगळ्या सस्तन प्राण्यांमधील ACE2 रिसेप्टर्सबरोबर देखील एकत्र येऊ शकतो, म्हणजेच अनेक 'इंटरमिडीएट होस्ट'च्या माध्यमातून याचे मानवांमध्ये संक्रमण होऊ शकते. मात्र संशोधकांनी यावर भर दिला आहे की, मानवी पेशींना संक्रमित करण्याची या व्हायरसची सध्याची क्षमता ही कोविड-१९ विषाणूपेक्षा खूपच कमी आहे. मानवी पेशींना जरी हा व्हायरस संक्रमित करू शकत असला तरी मानवी लोकसंख्येला याचा लगेचच धोका असल्याचे वाढवून दाखवण्याबाबत त्यांनी इशारा दिला आहे. अजून याचे निरीक्षण करणे आवश्यक असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. पण यामुळे जागतिक माहामारी येणार का? याबद्दलची साशंकता अद्याप तरी कायम आहे.साऊथ चायना मॉर्निंग पोस्टशी बोलताना शी यांच्या टीमने प्राण्यांमधून माणसात, तसेच मानवांमधून प्राण्यांमध्ये पसरणाऱ्या आजारांचा म्हणजेट झुनॉटिक प्रसाराचा (ZOONOTIC TRANSMISSION) धोका लक्षात घेता वटवाघुळांमध्ये तयार होणाऱ्या विषाणूंवर लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे सांगितले. दरम्यान या नवीन व्हायरसचा शोध अशा वेळी लागला आहे जेव्हा, कोविड-१९ च्या उगम स्थानाबद्दल वादविवाद सुरू आहेत. शी या प्रसिद्ध व्हायरोलॉजीस्ट आहेत आणि त्यांना बॅट करोनाव्हायरस बद्दल त्यांच्या व्यापक संशोधनासाठी ओळखले जाते. यामुळे त्यांना 'बॅटवुमन' असेही म्हटले जाते. त्यांनी वुहान इंस्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजीचा बचाव केला आहे. तसेच त्यांनी कोरोना व्हायरस प्रयोगशाळेतून बाहेर पडल्याचा दावा देखील त्यांनी फेटाळला आहे. व्हायरोलॉजिस्ट शी झेंगली यांच्या नेतृत्वाखालील चिनी संशोधकांच्या टीमने वटवाघुळांमधील हा नवीन करोना व्हायरस शोधला आहे. या नवीन व्हायरसचे नाव 'HKU5-COV-2' असे असून हा व्हायरस मर्बेकोव्हायरस सबजीनसशी संबंधित आहे. तसेच हा नव्याने आढळलेला स्ट्रेन कोविड-१९ प्रमाणेच, तशाच पद्धतीने मानवी पेशींमधील ACE2 रिसेप्टरबरोबर जोडला जाऊ शकतो, असेही रॉयटर्स या वृत्तसंस्थेने एका अभ्यासाच्या हवाल्याने दिलेल्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे. सेल या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासानुसार, HKU5-COV-2 हा व्हायरस प्रयोगशाळेत मानवी पेशींना संक्रमीत करत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे हा भविष्यात इतर प्राण्यांमध्ये पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, हा व्हायरस वेगवेगळ्या सस्तन प्राण्यांमधील ACE2 रिसेप्टर्सबरोबर देखील एकत्र येऊ शकतो, म्हणजेच अनेक 'इंटरमिडीएट होस्ट'च्या माध्यमातून याचे मानवांमध्ये संक्रमण होऊ शकते. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टशी बोलताना शी यांच्या टीमने प्राण्यांमधून माणसात, तसेच मानवांमधून प्राण्यांमध्ये पसरणाऱ्या आजारांचा म्हणजेट झुनॉटिक प्रसाराचा धोका लक्षात घेता वटवाघुळांमध्ये तयार होणाऱ्या विषाणूंवर लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे सांगितले. दरम्यान या नवीन व्हायरसचा शोध अशा वेळी लागला आहे जेव्हा, कोविड-१९ च्या उगम स्थानाबद्दल वादविवाद सुरू आहेत. शी या प्रसिद्ध व्हायरोलॉजीस्ट आहेत आणि त्यांना बॅट करोनाव्हायरस बद्दल त्यांच्या व्यापक संशोधनासाठी ओळखले जाते. यामुळे त्यांना 'बॅटवुमन' असेही म्हटले जाते. त्यांनी वुहान इंस्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजीचा बचाव केला आहे. तसेच त्यांनी कोरोना व्हायरस प्रयोगशाळेतून बाहेर पडल्याचा दावा देखील त्यांनी फेटाळला आहे



### पुन्हा महामारी येणार?

मात्र संशोधकांनी यावर भर दिला आहे की, मानवी पेशींना संक्रमित करण्याची या व्हायरसची सध्याची क्षमता ही कोविड-१९ विषाणूपेक्षा खूपच कमी आहे. मानवी पेशींना जरी हा व्हायरस संक्रमित करू शकत असला तरी मानवी लोकसंख्येला याचा लगेचच धोका असल्याचे वाढवून दाखवण्याबाबत त्यांनी इशारा दिला आहे. अजून याचे निरीक्षण करणे आवश्यक असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. पण यामुळे जागतिक महामारी येणार का? याबद्दलची साशंकता अद्याप तरी कायम आहे.चीनच्या संशोधकांनी वटवाघुळांमधील नवीन कोरोना व्हायरस शोधून काढला आहे, ज्यामुळे जगभरातील देशांची चिंता वाढली आहे.

# लग्न मोडलं म्हणजे आयुष्याचा शेवट होत नाही

## सगळे विसरून तुम्ही पुढे जायला हवे : सर्वोच्च न्यायालय

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**लग्न ही प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्वाची बाब असते. बदललेल्या काळानुसार आता लग्नानंतर जोडप्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतोय. जीवनशैलीतील बदल, कामाचा ताण, एकत्र कुटुंबपद्धतीत राहण्यास नकार यामुळे अनेक जोडप्यांमध्ये वाद होताना दिसतात.**

वाद इतके विकोपाला जातात की, त्याचा शेवट न्यायालयात होतो. न्यायालयासमोर अशाप्रकारचे हजारो प्रकरणे येत असतात. सर्वोच्च न्यायालयात अशाच एका प्रकरणाची सुनावणी झाली असता न्यायाधीश अभय ओक यांनी संबंधित जोडप्याचे समुपदेशन केले.एखाद्याचे लग्न तुटले याचा अर्थ त्याचे आयुष्य संपले असे होत नाही. सगळे विसरून तुम्ही पुढे जायला हवे", असा सल्ला न्या. अभय ओक यांनी जोडप्याला दिला.न्या. अभय ओक यांच्या खंडपीठासमोर घटस्फोटाच्या प्रकरणाची सुनावणी झाली. मे २०२० मध्ये या जोडप्याचे लग्न झाले होते. लग्नानंतर वाद झाल्यामुळे दोघांनीही एकमेकांवर १८ खटले दाखल केले होते. सर्वोच्च न्यायालयाने हे खटले रद्दबातल ठरवत दोघांनाही आयुष्यात पुढे जाण्याचा सल्ला दिला. खंडपीठाने म्हटले, "दोन्ही पक्षकार तरूण आहेत. त्यांनी आता भविष्याकडे पाहिले पाहिजे. जर लग्नात अपयश आले असले तरी हा आयुष्याचा शेवट नाही. दोघांनीही आता नव्या आयुष्याची सुरुवात करायला हवी."जोडप्याने यापुढील काळात शांततेत जगावे, असाही सल्ला खंडपीठाने दोघांना दिला. अनेक दुर्दैवी प्रकरणांपैकी हे एक प्रकरण असल्याचे खंडपीठाने म्हटले.



### आता भविष्याकडे पाहिले पाहिजे

पती आणि सासरच्या लोकांकडून सतत छळ होत असल्याचा आरोप विवाहितेने केला. न्यायालयाने दोन्ही पक्षांची बाजू मांडणाऱ्या वकिलांना सल्ला दिला की, या खटल्यात पडणे निरर्थक ठरू शकते. कारण हे वर्षानुवर्ष चालत राहील.यानंतर वकिलांनी संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात सदर लग्न विसर्जित करण्याची विनंती केली. मे २०२० मध्ये लग्न झाल्यानंतर काही महिन्यातच विवाहितेने सासर सोडून माहेरी राहू लागली होती.

# 'पारू' ने घेतलं नवीन आलिशान घर

'झी मराठी' वाहिनीवरील 'पारू' मालिका सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. या मालिकेला प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद मिळताना दिसत आहे. अभिनेत्री शरयू सोनावणे, मुग्धा कर्णिक आणि प्रसाद जवादे यांची मुख्य भूमिका असलेली 'पारू' मालिका गेल्या वर्षभरापासून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. या मालिकेतील प्रत्येक कलाकार आता घराघरात पोहोचला आहे. फक्त पारू, आदित्य, अहिल्यादेवीचं नाही तर इतर पात्रांनी देखील प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यापैकीच एक म्हणजे अनुष्का. अभिनेत्री श्वेता खरातने अनुष्का हे पात्र साकारलं आहे. याच अनुष्काने म्हणजे श्वेताने नवीन आलिशान घर खरेदी केल्याचं समोर आलं आहे. याबाबत तिने स्वतः सोशल मीडियाद्वारे माहिती दिली आहे. श्वेताने नवीन घरातील गृहप्रवेशाचे फोटो शेअर केले आहेत.अभिनेत्रीने आपल्या कुटुंबाबरोबर नवीन घरात गृहप्रवेश केल्याचं पाहायला मिळत आहे. शेअर केलेल्या फोटोंमध्ये श्वेताचे आई-बाबा आणि भाऊ पाहायला मिळत आहे.

या आनंदाच्या दिवशी श्वेताने खास लूक केला होता. तिने केशरी रंगाची साडी नेसली होती, ज्यामध्ये श्वेता खूपच सुंदर दिसत आहे. श्वेताच्या नवीन घरातील गृहप्रवेशा दिवशी 'लाखात एक आमचा दादा' मालिकेतील सूर्या दादा म्हणजेच अभिनेता नितीश चव्हाणने खास हजेरी लावली होती. याचा फोटो तिने इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे.अभिनेत्री श्वेता खरातने नवीन घराची आनंदाची बातमी देताच तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतं आहे. अभिनेत्री अक्षया नाईक, स्वाती देवल, जुई बेंडखळे, सुमित पुसावळे, मुग्धा कर्णिक अशा अनेक कलाकारांनी श्वेताला शुभेच्छा दिल्या आहेत. तसंच चाहत्यांच्यादेखील प्रतिक्रिया उमटल्या आहेत.दरम्यान, श्वेता खरातच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, तिने मालिकांबरोबर चित्रपटांमध्येही काम केलं आहे. 'पारू' मालिकेआधी ती 'मन झालं बाजिंद', 'राजा रानीची गं जोडी' या मालिकांमध्ये पाहायला मिळाली होती. तसंच श्वेता 'तुला पण बाशिंग बांधायचंय', '143' चित्रपटांमध्ये झळकली होती. सध्या 'पारू' मालिकेतील श्वेताने साकारलेली अनुष्का प्रेक्षकांच्या पसंतीस पडली आहे.'झी मराठी' वाहिनीवरील 'पारू' मालिका सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहे.




# अंकिता दिसणार 'दर्याचं पाणी' या कोकणी गाण्यात


'देवमाणूस' फेम अभिनेता किरण गायकवाड लवकरच एका कोकणी गीतात पाहायला मिळणार आहे. कोकणचा जावई किरण 'दर्याचं पाणी' या गाण्यात झळकणार आहे. या गाण्याची पहिली झलक इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आली आहे. 'देवमाणूस' फेम अभिनेता किरण गायकवाड आणि अभिनेत्री अंकिता राऊत हे लवकरच साईरत्न एंटरटेनमेंट प्रस्तुत 'दर्याचं पाणी' या कोकणी गीतात एकत्र दिसणार आहेत. नुकताच त्यांनी सोशल मीडियावर दर्याचं पाणी या गाण्याचा प्रोमो शेअर केला आहे. अलिबागच्या नयनरम्य समुद्र किनारी या गाण्याचं चित्रीकरण झालं आहे. या गाण्याचे निर्माते संदेश गाडेकर आणि सुरेश गाडेकर हे आहेत. गायक रोहित राऊत आणि गायिका सोनाली सोनवणे यांनी हे गाणं गायलं असून श्रद्धा दळवी हिने या गाण्याचे बोल लिहिले आहेत. विजय बुटे यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या गाण्याला अमेय मुळे यांनी संगीत दिलं आहे.कोकणचा जावई म्हणजेच अभिनेता किरण गायकवाड दर्याचं पाणी या गाण्याच्या प्रोसेसविषयी सांगतो, "माझी खूप आधीपासून इच्छा होती की एकदा तरी कोकणी गीतात काम करायचं. दिग्दर्शक विजय बुटे यांनी जेव्हा या गाण्याची संकल्पना माझ्याजवळ व्यक्त केली. तेव्हा मी फारच उत्सुक होतो. कोळी गेटअप मध्ये नाचताना खूप मज्जा आली. आणि समुद्र म्हणजे माझा आवडता विषय असल्या कारणाने, दिवसभर समुद्र किनारी बागडायला आणि शूटिंग करायला धम्माल आली. विशेष म्हणजे माझ्या कोळी लूकवर सोशल मीडियाद्वारे माझे फॅन्स छान छान कमेंट्स करून प्रेमाचा वर्षाव करत आहेत. हे पाहून खूपच आनंद झाला. किरण गायकवाडबद्दल बोलायचं झाल्यास त्याने डिसेंबर महिन्यात अभिनेत्री वैष्णवी कल्याणकर हिच्याशी लग्न केलं आहे

# होळी सणाबाबत फराह खानचं आक्षेपार्ह विधान





बॉलिवूडची दिग्दर्शिका आणि प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक फराह खानच्या विरोधात फौजदारी स्वरुपाची तक्रार दाखल करण्यात आली आहे. सेलिब्रिटी मास्टरशेफ या कार्यक्रमात फराह खानने होळी सणाबाबत एक विधान केले होते, या विधानावर युट्यूबर विकास पाठक ऊर्फ हिंदुस्तानी भाऊ यांनी आक्षेप घेतला असून त्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. २० फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झालेल्या भागात फराह खान म्हणाल्या की, होळी हा सर्व छपरी मुलांचा आवडता सण आहे. या विधानानंतर हिंदुस्तानी भाऊने दाखल केलेल्या तक्रारीनुसार शुक्रवारी खार पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला.



# बलात्कार प्रकरणाकडे लक्ष द्या : राखी सावंत

समय रैनाचा वादग्रस्त कार्यक्रम 'इंडियाज गॉट लेटेंट' प्रकरणी महाराष्ट्र सायबर सेलने राखी सावंतला समन्स बजावला आहे. २७ फेब्रुवारीला तिला जबाब नोंदवण्यासाठी महाराष्ट्र सायबर सेलच्या कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सध्या राखी सावंत चर्चेत आली आहे. महाराष्ट्र सायबर सेलने समन्स बजावल्यानंतर राखी सावंतची प्रतिक्रिया समोर आली आहे.सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी'च्या इन्स्टाग्राम पेजवर राखी सावंतचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये राखी सावंत म्हणाली, "मला समन्स बजावण्यात काहीही अर्थ नाहीये. तुम्ही मला व्हिडीओ कॉल करा, मी सगळ्या प्रश्नांची उत्तरं द्यायला तयार आहे. मी एक कलाकार आहे. मला पैसे देऊन बोलावलं होतं. मी माझं काम केलं. मी कोणाला शिव्या पण दिल्या नाहीत. त्यामुळे मला समन्स बजावण्यात काही अर्थ नाही."पुढे राखी सावंत म्हणाली की, प्रलंबित बलात्कार प्रकरणारकडे लक्ष द्या, त्याचा सोक्षमोक्ष लावा.

# थोडं भान ठेवायला हवं अभिनेत्री विशाखा सुभेदार

कॉमेडियन समय रैनाच्या 'इंडियाज गॉट लेटेंट' या शोमध्ये केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे गेल्या काही दिवसांपासून युट्यूबर रणवीर अलाहाबादिया सर्वत्र चर्चेत आहे. शोमध्ये रणवीरने एका स्पर्धकाला पालकांच्या प्रायव्हसीबद्दल प्रश्न विचारला होता. शोमधील हा व्हिडीओ व्हायरल होताच रणवीरवर सर्व स्तरांतून टीका होऊ लागली. एवढंच नव्हे तर त्याच्याविरोधात तक्रार सुद्धा दाखल करण्यात आली. रणवीर अलाहाबादिया, समय रैना, अपूर्वा मखीजा, आशीष चंचलानी या चार जणांची वैयक्तिक चौकशी देखील सुरू आहे. याशिवाय समय रैनाने देखील 'इंडियाज गॉट लेटेंट'चे सर्व शो युट्यूबवरून हटवतोय असं स्पष्टीकरण देत सर्वांची माफी मागितली आहे. या संपूर्ण प्रकरणावर आता बॉलीवूडसह मराठी कलाविश्वातील कलाकार सुद्धा व्यक्त होऊ लागले आहे.विनोदाचं अचूक टायमिंग साधत गेली कित्येक वर्षे महाराष्ट्रातील प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी अभिनेत्री म्हणून विशाखा सुभेदारला ओळखलं जातं. तिने आजवर 'महाराष्ट्राची हास्यजत्रा', 'कॉमेडीची बुलेटट्रेन', 'फू बाई फू' असे अनेक विनोदी कार्यक्रम केले आहेत. याशिवाय विशाखाने असंख्य चित्रपटांमध्ये विनोदी व्यक्तिरेखा देखील साकारल्या आहेत. अभिनेत्रीने सविस्तर पोस्ट शेअर करत 'इंडियाज गॉट लेटेंट' शो आणि रणवीर अलाहाबादिया केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबाबत आपलं मत मांडलं आहे.

# ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडवर ऐतिहासिक विजय!

## 16 वर्षांनी जिंकला चॅम्पियन्स ट्रॉफीतील पहिला सामना

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाच्या संघाने वनडे क्रिकेटमध्ये ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे. ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरूद्ध चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सामन्यात ५ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला आहे. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारली होती. पण हार मानेल तो ऑस्ट्रेलियाचा संघ कसला... बडे खेळाडू संघाचा भाग नसतानाही ऑस्ट्रेलियाच्या नवख्या संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील ऐतिहासिक विजय मिळवला आहे. २००९ नंतर म्हणजेच १६ वर्षांनी ऑस्ट्रेलियाने चॅम्पियन्स ट्रॉफीत पहिल्या सामन्यात विजय मिळवला आहे.**




इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद ३५१ धावांचा डोंगर उभारला होता. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात आजवर कोणत्याच संघाने इतकी मोठी धावसंख्या उभारली नव्हती. पण इंग्लंडने बेन डकेटच्या १६५ धावांच्या विक्रमी खेळीच्या जोरावर ही कामगिरी आपल्या नावे केली. पण ऑस्ट्रेलियाने मात्र ५ विकेट्सने विजय मिळवत आपल्या नावे नवा रेकॉर्ड केला आहे. ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठ्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करणारा पहिला संघ ठरला आहे.ऑस्ट्रेलियाचे संघातील वरिष्ठ खेळाडू स्टीव्ह स्मिथ आणि ट्रॅव्हिस हेड स्वस्तात बाद झाले.

पण नवा सलामीवीर मॅथ्यू शॉर्टने ६३ धावांची खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. यानंतर मार्नस लबुशेनने ४७ धावांची खेळी केली. तर संघाचा यष्टीरक्षक फलंदाज जोश इंग्लिसने वनडेमधील आपले पहिले शतक झळकावत मोठा विक्रमही आपल्या नावे केला. इंग्लिसने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील संयुक्त जलद शतक झळकावले आहे. त्याने वीरेंद्र सेहवागच्या विक्रमाची बरोबरी केली. जोश इंग्लिसने ८६ चेंडूत ६ षटकार आणि ८ चौकारांसह १२० धावांची नाबाद खेळी केली. यानंतर अॅलेक्स कॅरीसह त्याने केलेली भागीदारी मॅचविनिंग ठरली.अॅलेक्स कॅरीने ६३ तेंडूत ८ चौकारांसह ६९ धावांची खेळी केली तर मॅक्सवेलनेही येताच चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. मॅक्सवेलने १५ चेंडूत २ षटकार आणि ४ चौकारांसह इंग्लिसला चांगली साथ दिली. इंग्लंडच्या गोलंदाजांची या नव्या ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी धुलाई केली. जोफ्रा आर्चरविरूद्ध १० षटकांत ८२ धावा केल्या ज्यात त्याने १ विकेट घेतली. याशिवाय जो रूट वगळता सर्व गोलंदाजांनी एकेक विकेट घेतली.तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकल्याने इंग्लंडला गोलंदाजीसाठी पाचारण केले होते. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद ३५१ धावा केल्या होत्या.फिल सॉल्ट १० धावा करून बाद झाला. यानंतर बेन डकेटने १६५ धावांची ऐतिहासिक खेळी केली. यानंतर जो रूटने ६८ धावा केल्या.

### बेन डकेटने ऐतिहासिक खेळी केली

जोस बटलर २३ धावा, लिव्हिंगस्टोन १४ धावा तर जोफ्रा आर्चरने २१ धावा करत संघाला विक्रमी धावसंख्या उभारून दिली. ऑस्ट्रेलियाकडून बेन द्वारशुईसने ३ विकेट्स मॅक्सवेलने एक तर झाम्पा आणि लबुशेनने प्रत्येकी २-२ विकेट घेतल्या.

इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद ३५१ धावांचा डोंगर उभारला होता. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात आजवर कोणत्याच संघाने इतकी मोठी धावसंख्या उभारली नव्हती. पण इंग्लंडने बेन डकेटच्या १६५ धावांच्या विक्रमी खेळीच्या जोरावर ही कामगिरी आपल्या नावे केली. पण ऑस्ट्रेलियाने मात्र ५ विकेट्सने विजय मिळवत आपल्या नावे नवा रेकॉर्ड केला आहे. ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठ्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करणारा पहिला संघ ठरला आहे.

# युपी वॉरियर्जने वुमन्स मिळवला पहिला विजय

## वेस्ट इंडिजच्या ग्रेस हॅरिसने हॅटट्रिक घेत महत्त्वाचे योगदान दिले

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**युपी वॉरियर्जने वुमन्स प्रीमियर लीग २०२५ मधील पहिल्या विजयाचा आनंद लुटला आहेय. ग्रेस हॅरिसच्या हॅटट्रिकच्या जोरावर युपीने दिल्लीचा ३३ धावांनी पराभव केला. दीप्ती शर्माच्या नेतृत्त्वाखाली युपीचा यंदाचा हा पहिला विजय आहे. या विजयात चिनेल हेन्रीने ६२ धावांची खेळी करत तर ग्रेस हॅरिसने हॅटट्रिक घेत महत्त्वाचे योगदान दिले.**



बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना यूपीने चिनेल हेन्रीच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर २० षटकांत ९ गडी गमावून १७७ धावा केल्या. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्स संघ १९.३ षटकात केवळ १४४ धावा करू शकला आणि सर्वबाद झाला. लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात काही खास नव्हती. त्यांना पहिला धक्का पाचव्या षटकात २६ धावांच्या स्कोअरवर कॅप्टन मेग लॅनिंगच्या रूपात बसला. लॅनिंगला क्रांती गौरने क्लीन बोल्ड केले. तिला केवळ पाच धावा करता आल्या. तर सलामीवीर शेफाली वर्मा २४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. दिल्लीकडून जेमिमाह रॉड्रिग्जने सर्वाधिक ५६ धावांची खेळी खेळली. तिने ३५ चेंडूत ८ चौकार आणि एक षटकार ठोकला. याशिवाय मारिजन कॅपने ९ धावा, अॅनाबेल सदरलँडने ५ धावा, जेस जोनासनने ५ धावा, सारा ब्राइसने ५ धावा, निक्की प्रसादने १८ धावा आणि शिखा पांडेने १५* धावा केल्या.तर अरुंधती रेड्डी आणि मिन्नू मणी यांना खातेही उघडता आले नाही. यूपीकडून क्रांती गौर आणि ग्रेस हॅरिसशिवाय चिनेल हेन्री आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. ग्रेस हॅरिसने २.३ षटकांत १५ धावा देत ४ विकेट घेतल्या आणि तिने हॅटट्रिकही आपल्या नावे केली.दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध वेस्ट इंडिजच्या चिनेल हेन्रीने २३ चेंडूंत आठ षटकार आणि दोन चौकारांच्या मदतीने ६२ धावा केल्या. एका वेळेला यूपीची अवस्था खूपच वाईट होती, संघाने १४ षटकांत ९१ धावांवर सहा विकेट गमावल्या होत्या. वेस्ट इंडिजची हेन्रीने १९व्या षटकात अरुंधती रेड्डीला तीन षटकार गमावत १८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. तिने २०२३ च्या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध गुजरात जायंट्सच्या सोफिया डंकलेच्या विक्रमाची बरोबरी केली. आठव्या क्रमांकावर आलेल्या हेन्रीच्या या खेळीच्या जोरावर यूपीने भक्कम धावसंख्या उभारली तर त्यांचे विशेषज्ञ फलंदाज काहीही करू शकले नाहीत.दिल्लीच्या गोलंदाजांनी ८९ धावांत यूपीचे ६ विकेट घेतले होते. यूपीकडून किरण नवगिरेने २० चेंडूत १७ धावा केल्या. तत्पूर्वी, मारिजन कॅपने वृंदा दिनेशला (४) स्वस्तात बाद केले. जेस जोनासेनने दीप्ती शर्मा (१३) आणि ताहलिया मॅकग्रा (२४) यांची विकेट घेतली तर कॅपने १३व्या षटकात ग्रेस हॅरिस (२) यांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

### रॉड्रिग्जने 56 धावांची खेळी खेळली

बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना यूपीने चिनेल हेन्रीच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर २० षटकांत ९ गडी गमावून १७७ धावा केल्या. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्स संघ १९.३ षटकात केवळ १४४ धावा करू शकला आणि सर्वबाद झाला.लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात काही खास नव्हती. त्यांना पहिला धक्का पाचव्या षटकात २६ धावांच्या स्कोअरवर कॅप्टन मेग लॅनिंगच्या रूपात बसला. लॅनिंगला क्रांती गौरने क्लीन बोल्ड केले. तिला केवळ पाच धावा करता आल्या. तर सलामीवीर शेफाली वर्मा २४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. दिल्लीकडून जेमिमाह रॉड्रिग्जने सर्वाधिक ५६ धावांची खेळी खेळली.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org